# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

जा.क्र./पोउआ/वाह/ ८९५० /२०२३ पुणे दिनांक - १५ /१२ /२०२३

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, वारजे वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी काही पार्किंगचे निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत आहेत.

<u>वारजे वाहतुक विभाग पुणे अंतर्गत</u>,

- **कृष्णाई प्लाझा कॅनॉल रोड कर्वेनगर पुणे लगतचे एम एस ई बी ट्रान्सफॉर्मर स्टेशन/ केळकर उपहारगृह ते आरोग्य कोठी समोरील बसवेश्वर टी हाऊस या दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांना १०० मीटर पर्यंत नो पार्किंग करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – १८ /१२/२०२३ ते दिनांक – ३०/१२/२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

Scanned with OKEN Scanner